# प्रामाणिक कार्य व्यक्तिमत्व विकासाची पहिली पायरी- प्राचार्य अरविद चौधरी
## स्वछता कामगाराने केले कार्यशाळेचे उदघाटन

(03.02.2020) व्यक्तीच्या कार्यातून व्यक्तिमत्व विकास घडतो व व त्याद्वारेच व्यक्तीची ओळख होते मात्र त्यासाठी काम प्रामाणिक व निष्ठापूर्ण असले पाहिजे म्हणूनच महात्मा गांधी नावाचे व्यक्तिमत्व जगाने मान्य केले असे प्रतिपादन प्राचार्य अरविद चौधरी यांनी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, विद्यार्थी विकास कक्ष व कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय बोदवड, विद्यार्थी विकास कक्ष आयोजित आतर महाविद्यालयीन विद्यार्थीनी व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा उदघाटन प्रसंगी व्यक्त केले उदघाटक म्हणून महाविद्यालयातील साफसफाई कर्मचारी श्रीमती शकुंतला पाटील तर प्रमुख अतिथी म्हणून नाहटा महाविद्यालयाच्या डॉ ममता पाटील, उपप्राचार्य डी एस पाटील उपस्थित होते

दि 3 फेब्रु रोजी सपन्न झालेल्या कारशाळेत संत मुक्ताबाई महाविद्यालय, मुक्ताईनगर, नाहटा माहाविद्यालय भुसावळ, कुऱ्हा काकोडा महाविद्यालय व बोदवड महाविद्यालयातील 55 विद्यार्थीनी उपस्थित होत्या प्रारंभी विद्यार्थी विकास अधिकारी प्रा नरेंद्र जोशी, डॉ व्ही पी चौधरी, डॉ गीता पाटील, यांनी उपस्थितांचे स्वागत केले श्रीमती शकुंतला पाटील यांनी दिपप्रजलित करून उदघाटन केले

प्रास्तविक डॉ गीता पाटील यांनी केले तर सूत्रसंचालन या विद्यार्थीनी केले

दिवसभात कार्यशाळेत डॉ ममता पाटील (पी व नाहटा भुसावळ) यांनी व्यक्तिमत्व विकासात सामाजिक मर्यादा व स्वातंत्र, श्रीमती वैशाली कुलकर्णी (सचालिका नदाई महिला बहुउद्देशीय संस्था) यांनी संपर्कद्वारा व्यक्तिमत्व विकास, प्रा निशा वाघ (हिरे इन्स्टिट्यूट मालेगाव) यांनी व्यक्तिमत्व विकासाचा विजयी आनंद, प्रा नरेंद्र जोशी यांनी विद्यापीठाच्या विविध योजनाद्वारे व्यक्तिमत्व विकास या विषयावर माहिती दिली कार्यक्रमाचा समारोप सायंकाळी उपप्राचार्य डी एस पाटील यांचे उपस्थितीत सपन्न झाला




